- HINDI
- MATHS
- ENGLISH
- MARATHI
- PHYSICS
- CHEMISTRY
- PHILOSOPHY
- BIOLOGY
- ENGINEERING
- INFORMATION TECHNOLOGY
- LIFE SCIENCES
- COMMERCE
- MANAGEMENT
- BUSINESS ORGANISATION
- SOCIOLOGY
- AGRICULTURE
- PUBLIC ADMINISTRATION
- HOME SCIENCE
- HUMAN SCIENCE
- MUSIC
- POLITICAL SCIENCE
- LAW
- ECONOMICS
- GEOGRAPHY
- EDUCATION
- HISTORY
- MILITARY SCIENCE
- COMPUTER
- PSYCHOLOGY
- HUMANITIES & SOCIAL SCIENCES
- LANGUAGES
- MANAGEMENT

ISSN 2395-759X

ISSN 2395-759X

स्वत्वाधिकारी, मुद्रक, प्रकाशक एवं संपादक – प्रा. मयुर बंडू लहाने द्वारा आकांक्षा टंक... बहुउद्देशीय संस्था
राममंदीर के पास, पेठ पुरा, हिवरखेड (रुप.), ता. तेल्हारा, जि. अकोला, महाराष्ट्र – ...03 से प्रकाशित

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject, Monthly Research Journal

Vol. VI • Issue IX • September 2020

Impact Factor : 5.025

# Akanksha...

New Directions & Challenge

आकांक्षा...

# आकांक्षा...

नवी दिशा आणि आव्हाने.



**Editor - In - Chief**

*Prof. Mayur Bandu Lahane*

Published by :- Akanksha Tankalekhan Multipurpose Society
N... am Mandir, Peth Pura, Hiwarkhed (Rup.), Tq. Telhara, Dist. Akola, (MH) 444 103

# Index


| Sr. No. | Contents | Page No. |
|---|---|---|
| 1. | ''बुलढाणा जिल्ह्यातील व्यावसायिक संरचनेचे भौगोलिक विश्लेषण''<br>– डॉ. संदीप रूपरावजी मसराम | १–१२ |
| 2. | ''रोग ही विश्वव्यापी सामाजिक घटना आहे एक समाजशास्त्रीय अध्ययन ''<br>– डॉ. आनंदा भिकुजी काळे | १३–२० |
| 3. | '' बहुजन शिक्षण आणि भाऊसाहेब ''<br>– प्रा. डॉ. सुनंदा रेवसे | २१–२५ |


89

## Advisory Committee

**Dr. Vikas Singhal**
Assistant Reginal Director,
Indira Gandhi National Open University,
Nagpur.
**Dr. Pranay R. Malviya**
Principle,
Dr. Panjabrao Deshmukh collage of law,
Amravati
**Dr. S. K. Deshmukh**
Principle,
College of Enggneing and Techology,
Akola.
**Dr. Shubhash S. Gawai**
Head, Department of Pol. Science,
Bhartiya Mahavidyalay, Raja Peth,
Amravati.
**Dr. Rama R. Fuke**
Head, Department of Education
Priyadarshini college of Education, Nagpur.
**Prof. Vivek H. Hiware**
Head, Department of English
Shri Shivaji College, Akola

## Peer Committee

**Prof. Ille C. Gebeshuber**
Professer of Physics
Vienna University of Technology
Austria (Europe)
**Prof. Diana L Gustafson**
Faculty of Medicine,
Memorial University of Newfoundland,
Canada
**Dr Richard Clay**
Department of Art History,
University of Birmingham,
Edgbaston UK
**Dr. Mutavalli Maizoddin Mainoddin,**
Depertment of Marathi
Ranichananama University
Belgaon Karnatak
**Dr. Sanjay M. Ayade**
Govt. College of Education Bilaspur,
Chhattisgarh
**Dr. Dilip Alone**
Depertment of Marathi
L.T.M. College Wani

## Peer Review Committee

**Dr. Vilas V. Tayde**
Depertment of Marathi
Shri Shivaji Arts, Comm. & Science College,
Akot.
**Dr. Kamlakar Payas**
Depertment of Marathi
Takshashila college, Amravati
**Dr. Sunanda K. Reose**
Depertment of Marathi
Shri Pundalik Maharaj Mahavidyalay
Nandura Railway Dist Buldhana
**Dr. Dnyaneshwar S. Shambhrkar**
Head, Department of Pol. Science,
S.B. Mahila Mahavidyalay Mahal,
Nagpur.

**Dr. G. L. Gulhane**
Head, Department of Education
Sant Gadage Baba Amaravati University
Amravati.
**Dr. Santosh N. Tade**
Head, Depertment of Economics
Shri Narshing College, Akot
**Dr. Basant Tripathi**
Head, Department of Hindi,
S.B. Mahila Mahavidyalay Mahal,
Nagpur.
**Dr. Suvarna Shinde**
Head, Department of English,
Arts & Commerce College for Women
Deopur, Dhule.

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal.
Vol. VI, Issue IX, September 2020
ISSN : 2395-759X

असावे की माझ्या वऱ्हाडाची लेकरं माझ्या घरी आली आणि न खाता परत गेली तर 'भातकं' थूऽऽ लेकाची जिंदगी बंगल्यावरील भावनेचा हा सुगंध आम्ही सावटला !"४

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी दुसऱ्या दिवशी आमच्या शाळेतील मुलांची व तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहर लाल नेहरू यांची भेट घडवून दिली. या प्रसंगावरून मधुकर वाकोडे म्हणतात की, 'वेद वाङमयातील धर्माचा उगम आणि विकासयां सारखे वेदांवर संशोधन करणारे ' असे ठासून सांगणारे दुसरे तुकारामच 'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा' भाऊसाहेब म्हणजे वाटले. ते गेले तेव्हा हेच शब्द माझ्या ओठांवर फुलले

"भावभोळ्या जिवा वाटे तुक्याचा अवतार
मुक्या ओठांतून आता वेद काढी निरंतर५"

स्रीउन्नतीच्या बाबतीत डॉ. भाऊसाहेब देशमुख हे प्रति परमेश्वर ठरतात. त्यांच्या शिक्षणाच्या मदतीने वऱ्हाडतील मुली शिक्षण घेऊ लागल्या. मुलींना मुलांची बरोबरी करण्याची संधी प्राप्त झाली. मुलींचे जीवन हे अर्थपूर्ण ठरले. या अर्थपूर्ण जीवनाचे उत्तम उदाहरण आपल्या देशातील राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे देता येईल (माजी). प्रा. कुसुमावती देशपांडे यांची मौरिस कॉलेज मधील नियुक्ती ही त्यांनी स्त्री हक्काला दिलेली पहिली हाक होय. प्रि. टॉप्पिंगचा विरोध पत्करून प्रा. मदन गोपाल यांची प्राध्यापक पदी केलेली नियुक्ती म्हणजे त्यांनी केलेला योग्यतेचा सन्मान होय. डॉ. एस. एस. मोडक यांच्या वाणीत थोडा दोष असूनही असिस्टंट ' म्हणून नियुक्ती दिली 'इन्स्पेक्टर ऑफ स्कुल. बुद्धीचा सत्कार करणे ही डॉ. पंजाबराव देशमुख यांची खासीयत होती.

डॉ. लक्ष्मणराव कोपर्डेकर गरिबीत वाढले. पण बर्लिनच्या व्यायाम विश्वविद्यालयात साडेतीन वर्षे अत्युच्च ज्ञान संपादन करून डी. पी. ई. होऊन आले. अशा उच्च शिक्षित व्यक्तीसाठी इथे नोकरी नव्हती. डॉ. भाऊसाहेबांनी स्वतः नागपूर विद्यापीठात शारीरिक शिक्षणाचा नवा विभाग निर्माण करून डायरेक्टर म्हणून कोपर्डेकर यांना नेमले व त्यांनाच नव्हे तर व्यायाम शिक्षणालाही योग्य तो सन्मान प्राप्त करून दिला. भाऊसाहेबांना गुणवत्तेचे अपार आकर्षण होते. गुणवंतांवर होणार अन्याय ते सोसायला तयारच नसत.

यासंदर्भात सर्वात बोलके उदाहरण म्हणजे नलिनीताई लढके यांचे देता येईल. त्या सांगतात, "मी तेव्हा नगरपालिकेत प्राथमिक सहाय्यक शिक्षिका होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या कार्यक्रमात मी अध्यक्ष पदावरून हा समर्थनात भाषण केले "हिंदुकोडबीलाच्या" माझा गुन्हा. नोटीस मिळाली. चर्चाही खूप झाली. तितक्यात भाऊसाहेब अमरावतीला आले होते. अँड. चौबळ यांच्याकडे ते बसले होते. श्री विधाते गुरुजी तेथून माझ्याकडे आले. आपण हे प्रकरण भाऊसाहेबांना सांगू. तेथे चला असे म्हणाले एवढ्या मोठ्या व्यक्तिचे राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर कार्य आहे.माझा हा लहानसा प्रश्न आहे. शिवाय प्रत्यक्ष परिचयपण नाही. म्हणून मला भाऊसाहेबांना भेटायचीहिंम्मत होत नव्हती !. विधाते गुरुजी मला भाऊसाहेबांकडे घेऊन गेलेच. विधाते गुरुजी मला घेऊन भाऊसाहेबांकडे गेलेच विधाते गुरुजींनीच नोटिसचे

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal.
Vol. VI, Issue IX, September 2020
ISSN : 2395-759X

कारण, कारण माझी नोकरी, कौटुंबिक माहिती, सामाजिक कार्य, प्रवेश वगैरे माहिती भाऊसाहेबांना सांगितली. बैठकीत असलेल्या मंडळीने चर्चा केली. भाऊसाहेब मला उद्देशून म्हणाले, "सामाजिक कार्याबद्दल असा अन्याय झाला तर त्या साठी संघर्ष करू. आपली वकील मंडळी तुमच्या पाठीशी उभी राहील भाऊसाहेबांना सर्वसामान्यांवर होणाऱ्या अन्यायाच्या निवारणाचे कार्यसुद्धा जागतिक स्तरावरील कार्याइतकेच महत्वाचे वाटत असे असे त्या अनुभवा नंतर मला जाणवलेखरं म्हणजे भाऊसाहेबांच्या गुणग्राही वृत्तीमुळे योग्य जागी योग्य ' ६" व्यक्तीची निवड होत गेली. प्रत्येकात गुणवत्तेची कदर भाऊसाहेब करत असत.

डॉ. पंजाबराव देशमुख हे रत्नपारखी तर होतेच, पण त्यापेक्षाही ते एक कुशल संघटक होते. समाजात त्यांना जेव्हा जेव्हा उर्जेचा यायचा तेव्हा तेव्हा ते संघटन कौशल्य उसळत असे आणि त्यातून नवनव्या संघटना आकार घेत असत. समाजातील विखुरलेल्या ऊर्जास्त्रोताला त्यांनी वेळोवेळी योग्य त्या दिशेने वळते केले. देशाच्या स्वतंत्र लढ्यात स्वतःला झोकून देणाऱ्या क्रांतिकारकबद्दल एक रसरशीत आस्था होती. त्यांच्या कुटुंबाविषयी कणव अन् काळजी होती. त्यांना जीवनात सुस्थिर करण्याविषयी ते सदैवं दक्ष असत प्रा.भाऊ भालेराव यांचे वडील श्री जगदेवराव पाटील हे हुतात्मा झाले होते . त्यामुळे भाऊभालेरावांच्या शिक्षणाची आबाळ होत होती. अशा स्थितीत भाऊसाहेबांनी तत्कालीन मुख्यमंत्री रविशंकर शुक्ला यांना जगदेवराव पाटलांच्या मुलाला, भाऊ भालेराव यांना स्कॉलरशीप मिळावी म्हणून विनंती केली.

भाऊसाहेबांना कमी अधिक प्रमाणात सहासष्ट वर्षाचे आयुष्य लाभले होते. त्यात कायदेपंडित म्हणून,शेतकऱ्यांचा त्राता म्हणून शिक्षणमहर्षी म्हणून, विज्ञानपंडित म्हणून आणि एक दार्शनिक म्हणून आपला एक ठसा तत्कालीन समाजावर उमटवला समाजात इतस्ततः विखुरलेली अनेक मौल्यवान रत्ने त्यांनी वेचली आणि ठिकठिकाणच्या सत्कार्यात, भारताच्या विकास कार्यात-चपखलपणे जाऊवली.त्यात त्याची गुणग्राहकता तर दिसतेच, पण त्याच्या चर्च्या असणाऱ्या कल्पकतेचाही प्रत्यय येतो."७ या संदर्भात अन्स्टटोल यांचे मत नमूद करावेसे वाटते. आज आपल्याला भावनेच्या प्रवाहात वाहून जाणारी आंधळी माणसे नकोत. वस्तुस्थितीचा कडवटपणा जाणवू लागला की असली माणसे निराश होतात. हातपाय गळतात आणि स्वतःच्याच ध्येयवादाचे आश्रद्ध टीकाकार होण्यात त्यांना धन्यता वाटते. कुठल्याही प्रकारच्या स्वप्न रंजनात गुंग न होणारी वास्तवाची परिपूर्ण जाणीव असणारी आणि ही जाणीव असूनही लढू इच्छिणारी काहीतरी करू इच्छिणारी, जग बदलू इच्छिणारी झुंझार माणसे आपल्याला हवी आहेत. कोणत्याही समाजपद्धतीत पृथ्वीवर स्वर्ग अवता शकत नाही. जिकडे-तिकडे आनंदीआनंद नाचत बागडत आहे. अस दृश्य दिसणार नाही. जिच्यात दुःख नाही, कलह नाही, संग्राम नाही अशी समाजपद्धती ही कदाचित कल्पनाच ठरेल. देवावर श्रद्धा ठेवूनही उपासनेकरिता ज्याला त्याला मूर्तीची गरज भासत नाही त्याचीच भूमिका अत्यंत उच्च, पवित्र आणि प्रामाणिक असते. ज्याच्या अंगात हे

सामर्थ्य आहे. तोच या जगात खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकतो. "डॉ पंजाबराव देशमुख यांनी शिक्षण आणि आरोग्य या दोन बाबींवर खर्च करायला सांगितले व तसा त्यांनी कायद्यात उल्लेखही करून घेतला होता हे टोलरच्या मताच्या पूर्णतेचेच प्रतीक नाही काय?"

डॉ. पंजाबराव देशमुखांनी बहुजनांच्या दारात शिक्षणाची गंगा आणून दिली सर्वसामान्य माणूस संतुष्ट झाला. म्हणूनच त्यांचे नाव काढले की आठवते सुधाकर गायधनी यांचे गीत

हे महानायक,
तूच खरा आमच्या जनसंस्कृतीचा पोशिंदा
तू नेत्यांचा नेता अन् देशभक्त खंदा
शेतातील पिके तुझे
सदा गातात गाणे
माय-माऊली-शेतमाऊलीची
गहिवरतात मने.
शेतकऱ्यांचा कष्टकऱ्यांच्या
तू जातीवंत सम्मान
तुझ्या मुळेच ताठ झाली भूमीपुत्राची मान
बळीराजा अन् शिवाजी
प्रत्यक्ष पहिली नाहीत आम्ही
पण अनुभवले खात्रीने"[८]

## संदर्भ :-

१. रमेश अंधारे (संपादक) – मुद्रा महाराष्ट्राची, अमृत महोत्सवी (२००१) संदर्भ ग्रंथ, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती पृ. ५४४.
२. यशवंत मनोहर – विद्रोही कविता – उत्थान गुफा. समता संगर प्रकाशन, नागपुर.
३. प्रा. विना मोहोड – डॉ. वंदना मोहोड (संकलन व संपादन) पाने आठवणीची, वंदन प्रकाशन, मोतिनगर, अमरावती – ६ पृ.१३-१४.
४. प्रा. विना मोहोड – तत्रौव पृ. १४
५. प्रा. विना मोहोड – तत्रौव पृ. १४
६. प्रा. विना मोहोड – तत्रौव पृ. ९०-९१
७. रमेश अंधारे (संपादक) – मुद्रा महाराष्ट्राची, अमृत महोत्सवी (२००१) संदर्भ ग्रंथ, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती पृ. ५४१.
८. सुधाकर गायधणी – कब्रीतला समाधीस्थ (काव्यसंग्रह)